**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५**
**नगररचना संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यालयांतील लोकसेवा, आवश्यक कागदपत्रे, शुल्क, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी अधिसूचित करण्याबाबत...**

**नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**मध्यवर्ती कार्यालये, पुणे-४११००१**

क्रमांक : मलसेहअ-२०१५/कलम ३ अधिसूचना/टिपीव्ही-७/४६४१,
दि. २३.०७.२०१५

**निर्णय** : सोबत सदरहू विषयाची अधिसूचना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडली आहे.

(प्रतिभा भदाणे)
उपसंचालक, नगर रचना,
नागरी संशोधन घटक, पुणे

**प्रत माहितीस्तव सादर:-**

१) मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई.
३) मा.राज्यमंत्री महोदय (नवि) यांचे खासगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
४) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
५) मा.प्रधान सचिव (नवि-१) नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
६) मा.प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव:-**

१) मा.संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) मा.संचालक, नगररचना तथा सहसचिव नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) मा.संचालक, नगररचना तथा मुख्य नियोजक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
४) मा.सहसंचालक, नगररचना तथा सहसचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) मा.सहसंचालक, नगर रचना, पुणे / नागपूर / कोकण/ नाशिक/ औरंगाबाद / अमरावती विभाग / अंमलबजावणी कक्ष / मूल्यांकन,पुणे

६) उपसचिव (नवि-३), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) उपसचिव (नवि-२७), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) उपसंचालक, नगररचना, मुख्य कार्यालय, पुणे / नागरी संशोधन घटक, पुणे
९) उपसंचालक, नगररचना, बृहन्मुंबई
१०) अवर सचिव (नवि-११/१३/३०), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय (सर्व)
१२) कक्ष अधिकारी (नवि-९/१२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) नगर रचनाकार, शाखा कार्यालय (सर्व)
१४) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१५) कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय टिपीव्ही-१ / २/ ३ / ४ / ५ / ६ / ७
१६) श्री.रवींद्र ए.टाक, कनिष्ठ आरेखक, रेखाकला शाखा

/-सदरची अधिसूचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी.

१७) परिपत्रक संचिका (ना.सं.घ)

*******

# नगर रचना आणि मूल्यानिर्धारण विभाग,

मध्यवर्ती कार्यालय, पुणे-४११ ००१

दिनांक : 23/०७/२०१५

## अधिसूचना

**क्रमांक : मलोसेहअ २०१५/कलम ३ अधिसूचना/टिपीव्ही-७/ ७६९७**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५

ज्याअर्थी, राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ (यापुढे "उक्त अध्यादेश" असे संबोधले आहे) दि.२८/०४/२०१५ पासून अंमलात आला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशातील कलम-३ मधील तरतुदीनुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने उक्त अध्यादेश लागू झाल्यापासून ३ महिन्यांच्या कालावधीत आणि त्यानंतर वेळोवेळी, ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा, अधिसूचित करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखालील नगर रचना संचालनालयांतर्गत कार्यरत असणाऱ्या नगररचना कार्यालयांसाठी (यापुढे "उक्त कार्यालये" असे संबोधले आहे) उक्त अधिनियमाच्या कलम ३ अन्वये लोकसेवा अधिसूचित करण्याकरिता संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना शासनाच्या नगर विकास विभागाकडील परिपत्रक क्र. टिपीएस-१८१५/प्र.क्र.१८८/१५/नवि-१३, दि.१०/०७/२०१५ अन्वये सूचित केले आहे;

त्याअर्थी आता, उक्त कार्यालयांमार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा पुरविण्यास सक्षम पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी अनुसूची-'अ' मध्ये आणि नगर रचनाकार ह्या दर्जाचे अधिकारी "कार्यालय प्रमुख" असलेल्या शाखा कार्यालयांसाठी द्वितीय अपिलीय अधिकारी अनुसूची -'ब' मध्ये विहित केल्यानुसार अधिसूचित करण्यात येत आहेत.

# अनुसूची-'अ'

## (महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ चे कलम-३ अन्वये अधिसूचित करण्यात येत असलेल्या सेवांचा तपशील)

| अ क्र | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्रे | शुल्क | नियत काल-मर्यादा (कामाचे दिवस) | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी | द्वितीय अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | झोन दाखला देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. ७/१२ उतारा/ सिटी सर्व्हे उतारा<br>३.मोजणी नकाशा/ सिटी सर्व्हे नकाशा | शासनाने निश्चित केल्यानुसार | ७दिवस | **सहायक संचालक, नगर रचना ह्या दर्जाचे अधिकारी "कार्यालय प्रमुख" असलेली शाखा कार्यालये** | | |
| | | | | | सहायक नगर रचनाकार | नगर रचनाकार | सहायक संचालक, नगररचना |
| | | | | | **नगर रचनाकार ह्या दर्जाचे अधिकारी "कार्यालय प्रमुख" असलेली शाखा कार्यालये** | | |
| | | | | | सहायक नगर रचनाकार | नगर रचनाकार | अनुसूची 'ब' मध्ये नमूद केल्यानुसार |
| २ | भाग नकाशा देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. ७/१२ उतारा/ सिटी सर्व्हे उतारा<br>३.मोजणी नकाशा/ सिटी सर्व्हे नकाशा | शासनाने निश्चित केल्यानुसार | ३दिवस | **सहायक संचालक, नगर रचना ह्या दर्जाचे अधिकारी "कार्यालय प्रमुख" असलेली शाखा कार्यालये** | | |
| | | | | | सहायक नगर रचनाकार | नगर रचनाकार | सहायक संचालक, नगररचना |
| | | | | | **नगर रचनाकार ह्या दर्जाचे अधिकारी "कार्यालय प्रमुख" असलेली शाखा कार्यालये** | | |
| | | | | | सहायक नगर रचनाकार | नगर रचनाकार | अनुसूची 'ब' मध्ये नमूद केल्यानुसार |

## अनुसूची-'ब'
### (नगर रचनाकार ह्या दर्जाचे अधिकारी "कार्यालय प्रमुख" असलेल्या शाखा कार्यालयांसाठी निर्देशित करण्यात येत असलेले द्वितीय अपिलीय अधिकारी)

| अ.क्र. | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| १. | नगररचनाकार, बारामती शाखा | सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा |
| २. | नगर रचनाकार, चंद्रपूर शाखा | सहायक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा |
| ३. | नगररचनाकार, वर्धा शाखा | |
| ४. | नगररचनाकार, गडचिरोली शाखा | |
| ५. | नगररचनाकार, भंडारा शाखा | सहायक संचालक, नगर रचना, गोंदिया शाखा |
| ६. | नगररचनाकार, पालघर शाखा | सहायक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा |
| ७. | नगररचनाकार, रत्नागिरी शाखा | सहायक संचालक, नगर रचना, कोल्हापूर शाखा |
| ८. | नगररचनाकार, सिधुदुर्ग शाखा | |
| ९. | नगररचनाकार, धुळे शाखा | सहायक संचालक, नगर रचना, नंदुरबार शाखा |
| १०. | नगररचनाकार, उस्मानाबाद शाखा | सहायक संचालक, नगर रचना, सोलापूर शाखा |
| ११. | नगरररचनाकार, लातूर शाखा | |
| १२. | नगररचनाकार, बीड शाखा | सहायक संचालक, नगर रचना, परभणी शाखा |
| १३. | नगररचनाकार, जालना शाखा | सहायक संचालक, नगर रचना, औरंगाबाद शाखा |
| १४. | नगररचनाकार, बुलढाणा शाखा | सहायक संचालक, नगर रचना, अकोला शाखा |

०२. प्रस्तुतची अधिसूचना उक्त कार्यालयांच्या सूचना फलकावर तात्काळ प्रसिद्ध करण्यात यावी.

०३. प्रस्तुतची अधिसूचना संचालनालयाचे अधिकृत संकेतस्थळ **www.dtp.maharashtra.gov.in** वर देखील प्रसिद्ध करण्यात यावी.

(राजन अ.कोप)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे